**सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत**
**शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेष**
**पुरविणेबाबत.....**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र. एसएसए २०११/प्रक्र ३८/प्राशि ४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक - ४ फेब्रुवारी, २०११

**प्रस्तावना-** बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार सर्व शिक्षा अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१०-११ चालू आर्थिक वर्षाकरीता इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेष पुरविण्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेष पुरविण्याची सदर योजना, शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात आली असून, या योजनेमध्ये सर्व मुलींना आणि अनुसुचित जाती, अनुसूचित जमातीच्या सर्व मुलांना तसेच दारिद्रय रेषेखालील मुलांना प्रत्येकी दोन गणवेष पुरवावयाचे आहेत. त्यासाठी प्रति विद्यार्थी रु. ४००/- प्रमाणे तरतूद केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मंजूर केलेली आहे. केंद्र शासनाने ही योजना शाळा व्यवस्थापन समितीमार्फत राबवावी अशा मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. प्राथमिक शाळामध्ये विद्यार्थ्याचा गणवेष शासनाने यापूर्वीच विहित केलेला आहे. मुलांना सफेद रंगाचा शर्ट आणि खाकी रंगाची पँट तसेच मुलींना नेव्ही ब्लू रंगाचा स्कर्ट आणि सफेद रंगाचा ब्लाऊज निश्चित केलेला आहे. त्यानुसार शाळा व्यवस्थापन समितीमार्फत सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेष योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय -** सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेष योजना शासकीय शाळा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी च्या वर्गातील खालील विद्यार्थ्यांसाठी लागू राहील.

२. **<u>इयत्ता १ ली ते ८ वी च्या वर्गातील योजनेचे लाभार्थी -</u>**

**<u>अ) मुली -</u>** सर्व मुलीं या योजनेसाठी पात्र राहतील.

**<u>ब) मुले -</u>** (१) अनुसुचित जाती व अनुसूचित जमातीची सर्व मुले आणि,

(२) दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले या योजनेसाठी पात्र राहतील.

३. सदर योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेष पुरविण्यात यावेत. त्यासाठी प्रति विद्यार्थी रु. ४००/- प्रमाणे खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. गणवेष पुरविण्याची योजना केंद्र शासनाच्या आदेशानुसार सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत नियुक्त केलेल्या शालेय व्यवस्थापन समितीमार्फत (School Management Committee) विकेंद्रीत पद्धतीने राबविण्यात यावी. या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना गणवेषासाठी लागणारे कापडाची खरेदी व त्या कापडापासून गणवेषाची शिलाई करुन घेण्याची कार्यवाही शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात यावी.

५. या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांच्या गणवेषाची शिलाई, स्थानिक महिला अल्प बचत गटा मार्फत करण्यात यावी. जर एखादया ठिकाणी महिला अल्प बचत गट उपलब्ध नसेल तर नजिकच्या बचत गटांमार्फत शिलाई करुन घ्यावी आणि जर नजिकच्या ठिकाणीही बचत गट नसेल तर स्थानिक शिंप्याकडून शिलाई करुन घेण्यात यावी.

६. या योजनेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास दोन गणवेष संच देण्यात यावेत. गणवेषामध्ये मुलांना खाकी पॅन्ट व सफेद रंगाचा शर्ट व मुलींना नेव्ही ब्लु रंगाचा स्कर्ट व सफेद रंगाचा ब्लाऊज अशा प्रकारचा गणवेष देण्यात यावा. गणवेषासाठी लागणारे कापड शासनाने आरक्षित केलेल्या महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून शासनाने विहित केलेल्या दरकराराप्रमाणे घेण्यात यावे.

७. सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना मोफत प्रत्येकी २ गणवेषासाठी रु. ४००/- अशी दर मर्यादा विहित करण्यात आलेली असून गणवेषाच्या एका संचासाठी येणा-या रु.

२००/- खर्चापैकी काही निधी कापडासाठी आणि काही निधी शिलाईसाठी असा विभागण्यात यावा. सदर निधीची विभागणी शासन स्तरावर समिती नियुक्त करुन स्वतंत्रपणे करण्यात यावी.

८. **कापडाचे स्पेसिफिकेशन-** या योजनेंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे व एकसमान दर्जाचे गणवेष पुरविण्यासाठी कापडाचा दर्जा चांगला असणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन स्तरावर समिती नियुक्त करुन कापडाची निवड करुन त्यानुसार कापडाचे स्पेसीफिकेशन निश्चित करण्यात यावे. सदर निश्चित केलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे कापडाचा पुरवठा करुन घेण्याची कार्यवाही शाळा व्यवस्थापन समित्यांनी करावी.

९. **कापड खरेदी करण्याची कार्यपध्दती -** प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीने, त्यांच्या शाळेतील पात्र लाभार्थ्यांच्या वयोगटानुसार आणि विद्यार्थ्यांच्या मापानुसार (size प्रमाणे) मुलांसाठी आणि मुलींसाठी लागणा-या कापडाची यादी तयार करुन महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडे कापडाची मागणी नोंदवावी. शाळा व्यवस्थापन समित्यांनी त्यांच्या कापड पुरवठयाच्या मागणीची एक प्रत गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे द्यावी. प्रत्येक गट शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व शाळांसाठी लागणाऱ्या कापडाची मागणी एकत्रीत करुन, त्याचा तक्ता बनवुन तो शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे द्यावा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांनी सर्व तालुक्यातील (गटातील) कापडाची मागणी एकत्रीत करुन जिल्हयाचा एकत्रीत पुरवठा आदेश यंत्रमाग महामंडळास कळवावा. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाने शाळा व्यवस्थापन समित्यांकडून आलेल्या कापडाच्या मागणीप्रमाणे कापडाचा पुरवठा संबंधित शाळा व्यवस्थापन समित्यांकडे करावा. कापडाचा पुरवठा शाळा व्यवस्थापन समित्यांना प्राप्त झाल्यानंतर त्याची देयके नियमाप्रमाणे शाळा व्यवस्थापन समित्यांनी अदा करावीत. या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून कापडाचा पुरवठा करण्यासाठी कोणताही अगाऊ निधी (Advance Money) देण्यात येऊ नये.

१०. <u>**कापडाची तपासणी**</u> - यंत्रमाग महामंडळाने त्यांना प्राप्त झालेल्या पुरवठा आदेशानुसार लागणारे कापड तयार करताना त्यावर <u>सर्व शिक्षा अभियान मोफत गणवेषाचे कापड अशी प्रिंट कापडाच्या प्रत्येक ताग्यावर करावी.</u> यंत्रमाग महामंडळाने त्यांची जिल्हानिहाय गोदामे निश्चित करुन सदर गोदामाचे ठिकाण जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना कळवावे. शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी तीन सदस्यांची समिती तयार करुन, सदर समिती मार्फत यंत्रमाग महामंडळाच्या गोदामामधून गणवेषाच्या कापडापैकी निरनिराळया ताग्यातून पाच कापडाचे नमुने रॅन्डमली घेऊन ते सिल करुन शासनमान्य प्रयोग शाळेत तपासण्यासाठी पाठवावे. या समिती मधील तीन सदस्यांची नावे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी निवड करुन ठरवावीत. कापडाचे नमून्यांचे तपासणी अहवाल शासन मान्य प्रयोग शाळेकडून अनुकुल आल्यानंतर सदर गोदामामधील कापड सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेष योजनेसाठी वितरीत करण्यास पात्र असल्याचे प्रमाण पत्र शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी दयावे. त्यानंतर सदरचे कापड शाळा व्यवस्थापन समित्यांना पुरविण्यात यावे. गणवेष कापडाचे नमुने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत काढण्यात यावेत व त्यावर त्यांची सही शिक्के घेण्यात यावे. कापडाचे नमुने निवडताना यंत्रमाग महामंडळाचा प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्यास त्यांच्या अनुपस्थितीत कापडाचे नमुने निवडावे व प्रतिनिधीच्या अनुपस्थिती बाबत महामंडळास समितीने लेखी कळवावे. शासनाने विहित केलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे कापडाचे नमुने प्रयोगशाळा तपासणीत आढळून न आल्यास सदर कापड शाळांना वाटप करण्यात येऊ नये.

११. <u>**महामंडळाच्या कापड उत्पादन केंद्रांची तपासणी**</u> - शासनाने विहीत केलेल्या कापडाचा दर्जा उत्तम राखला जात आहे व सदर कापड उत्पादन केले जात आहे ह्याची खात्री केल्याची महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदे मार्फत तीन सदस्यांची समिती नियुक्त करुन महामंडळाच्या उत्पादन केंद्राची तपासणी करण्यात यावी.

१२. **<u>महामंडळाशी करावयाचा करारनामा</u>** - कापडाचा दर्जा, स्पेसिफिकेशन, कापडाच्या रंगाचा पक्केपणा व दंडात्मक अटी व शर्तीबाबत यंत्रमाग महामंडळाने राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्याशी करारनामा करणे आवश्यक राहील.

१३. **<u>गणवेशाची शिलाई करणे</u>** - शाळा व्यवस्थापन समित्यांना यंत्रमाग महामंडळाकडून त्यांच्या पुरवठा आदेशाप्रमाणे प्राप्त झालेले कापडापासून शाळा व्यवस्थापन समित्यांनी त्यांच्या स्तरावर विद्यार्थ्यांचे मोजमाप घेऊन गणवेषाची शिलाई करावी. गणवेषाची शिलाई शाळा व्यवस्थापन समित्यांनी स्थानिक महिला अल्प बचत गटा मार्फत करुन घ्यावी. जर एखाद्या ठिकाणी महिला अल्प बचत गट नसेल तर नजिकच्या बचत गटाकडून शिलाई करुन घ्यावी आणि जर नजिकच्या ठिकाणीही बचत गट नसेल तर स्थानिक शिंप्याकडून शिलाई करुन घेण्याची कार्यवाही शाळा व्यवस्थापन समित्यांनी करावी. गणवेषाची शिलाई करताना विद्यार्थ्यांना गणवेष आखुड व घट्ट होणार नाही याची दक्षता शाळा व्यवस्थापन समित्यांनी घ्यावी.

१४. **<u>गणवेष प्रमाणित करणे -</u>** शाळा व्यवस्थापन समित्यांनी स्थानिक स्तरावर गणवेषाची शिलाई करुन घेतल्यानंतर गटशिक्षणाधिका-यांनी त्यांच्या तालुक्यामधील शाळांची तपासणी करुन शिवलेले गणवेष योग्य मापाचे आहे याचे प्रमाणीकरण करुन त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे त्यांच्या गटाचा (तालुका) अहवाल सादर करावा. त्याचप्रमाणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांनी त्यांच्या जिल्हयातील सर्व गटांचे अहवाल घेऊन त्यानुसार त्यांच्या जिल्हयाचा एकत्रीत प्रमाणपत्र राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांना सादर करण्यात यावा.

१५. **<u>सर्व साधारण सुचना -</u>** केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत सन २०१०-११ या चालु आर्थिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना मोफत गणवेषाची योजना सुरु केलेली आहे. सदर योजना राबविण्यासाठी आता आर्थिक वर्षातील दोन महिने शिल्लक राहीलेले आहेत

त्यामुळे या कालावधीत गणवेषाचे कापड प्राप्त करुन घेणे व त्या कापडापासून शिलाई करण्याची कार्यवाही शाळा व्यवस्थापन समित्यांनी करणे आवश्यक राहील. प्रत्येक जिल्हयाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी सर्व गट शिक्षणाधिकाऱ्यांची बैठक घेऊन सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात सुचना दयाव्यात. तसेच गट शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील शाळा व्यवस्थापन समित्यांची / शाळा मुख्याध्यापकांची बैठक घेऊन सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मोफत गणवेष योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात यावे.

**१६.** सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात कापडाचा दर्जा (स्पेसिफिकेशन) तसेच गणवेषासाठी निश्चित केलेल्या रु. २००/- प्रति गणवेष या निधीपैकी प्रत्यक्षात कापडासाठी लागणारा निधी आणि शिलाईसाठी लागणारा निधी शासन स्तरावरील समितीमार्फत निश्चित करुन त्याबाबतचे आदेश स्वंतत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**१७.** सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेष योजना राबविण्यासाठी लागणारा निधी शाळा व्यवस्थापन समित्यांना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल.

हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in) २०११०२०४१८२२५८००१ या क्रमांकाने प्रसिद्ध करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**(ना.ऊ.रौराळे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत-
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री/राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री / मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे स्वीय सहाय्यक.
मा. मुख्यसचिव यांचे स्वीय सहाय्यक

मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
मा. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
मा. प्रधान सचिव, (वस्त्रौद्योग), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
मा. प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई.
उद्योग संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मु.का.अ.,जि.प. यांचेमार्फत )
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
सर्व पंचायत समित्यांचे गट शिक्षणाधिकारी ,(शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेमार्फत )
महालेखापाल- (१ व २), लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/नागपूर.
महालेखापाल-(१ व २), लेखा परीक्षा, मुंबई/नागपूर
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई- ४०० ०२०.
निवड नस्ती /प्राशि ४